29-06-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 6/28/2025 9:02 PM Page 1

दक्षिण गोवा जिल्हा नियोजन यंत्रणा ठप्प

मडगावच्या मास्टर प्लॅन २०४१ला गती | दक्षिण गोवा डीपीसीची एकही बैठक नाही : ३४०० प्रस्ताव पडून !

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. २८ : व्हिजन २०४१ ' अंतर्गत मडगावच्या शहरी भविष्याचा मास्टर प्लॅन तयार करण्यासाठी गोवा राज्य शहरी विकास संस्थेने (जीएसउडीए) सुरू केलेल्या हालचालींना वेग आला असतानाच, दक्षिण गोव्याच्या एकंदर विकासाच्या नियोजन प्रक्रियेतील गोंधळ आणि उदासीनतेचे वास्तव समोर आले आहे.

राज्य सरकारच्या प्रोत्साहनाने मडगावसाठी सल्लागार संस्था स्टुडिओ पॉड' मास्टर प्लॅनवर काम करत असताना, त्याच वेळी स्थानिक विकासाच्या प्राथमिक गरजांची नोंद घेणारी जिल्हा नियोजन समिती मात्र संपूर्णपणे निष्क्रिय ठरली आहे.

दक्षिण गोव्याच्या डीपीसी ने चालू आर्थिक वर्षात ना एकही बैठक घेतली, ना एकत्रित विकास आराखडा तयार केला. अधिकाऱ्यांच्या कबुलीनुसार, जिल्ह्यातील ग्रामपंचायती, नगरपालिका व जिल्हा पंचायत यांना नवीन विकास प्रस्ताव पाठवण्यास कोणतीही अधिसूचना दिलेली नाही. परिणामी, जिल्ह्याची अधिकृत विकास प्रक्रिया ठप्प झाली आहे.

एका वरिष्ठ अधिकाऱ्याच्या मते, गेल्या वर्षी सादर केलेले ३,४०० हून अधिक प्रस्ताव अजूनही पडून आहेत. अशा स्थितीत नवीन प्रस्ताव मागवण्याला अर्थ नाही.

या प्रशासकीय कुचकामीपणावर सरकार किंवा पंचायत संचालनालयाकडून कोणतीही चौकशी झालेली नाही. अधिकाऱ्यांनी मान्य केले की २०२५-२६ साठी कोणताही आराखडा तयार केला गेला नाही आणि सरकारकडे काहीही पाठवले गेलेले नाही.

पंचायतराज कायद्याच्या कलम २३९ नुसार डीपीसी ही घटनात्मक संस्था असून, जिल्ह्याच्या विविध स्तरांवरून आलेले विकास प्रस्ताव एकत्र करून राज्य सरकारकडे आराखडा पाठवणे तिचे प्रमुख काम आहे. मात्र ती संपूर्ण प्रक्रिया सध्या थांबलेली आहे.

या प्रकारावर नागरी गट आणि प्रशासन विश्लेषकांनी तीव्र टीका केली आहे. गोवा पंचायती राज संस्था संघाचे संयोजक जे. सँटन रॉड्रिग्ज म्हणाले, डीपीसी ही ऐच्छिक संस्था नाही. ती घटनात्मक आहे. ही घटनात्मक संस्था कलम २४३झेडडीच्या अंमलबजावणीसाठी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. यूजीएफ चे संयोजक डॉ. आशिष कामत यांनी नुकत्याच झालेल्या सादरीकरणात प्रश्न विचारला की , एमएमसीने आतापर्यंत किती विकास योजना डीपीसी कडे पाठवल्या? त्यांनी कायदेशीर मार्गदर्शक तत्त्वांचे पालन केले का?

कामत म्हणाले, मास्टर प्लॅनच्या घाईमुळे कायदेशीर नियोजन यंत्रणेला दूर सारले जात आहे. जर त्यांनी डीपीसी प्रक्रियेचे पालन केले असेल, तर त्या योजना सार्वजनिक कराव्यात.

शहरी केंद्रांवर केंद्रित मास्टर प्लॅनचे काम वेगाने सुरू असताना, जिल्ह्यातील ग्रामीण व अर्ध-शहरी भागांची विकास गरजा कोणत्याही नियोजनात समाविष्ट केल्या गेलेल्या नाहीत. पायाभूत सुविधा, पर्यावरणीय संवर्धन, स्थानिक गरजा या सर्व बाबी डीपीसी च्या माध्यमातूनच समाविष्ट होऊ शकल्या असत्या.

व्हिजन २०४१ ' मुळे मडगावचा शहरी नकाशा बदलू शकतो, पण संपूर्ण दक्षिण गोव्याचा विकास होण्यासाठी कायदेशीर नियोजन यंत्रणांचा पुनर्जीवित होणे अत्यावश्यक आहे. अन्यथा, राज्याच्या नियोजनात असमतोल वाढत राहील आणि स्थानिक स्वराज्य व्यवस्थेला बळकटी देण्याचे उद्दिष्ट अपूर्ण राहील असे तज्ज्ञांनी म्हटले आहे.

शहरी विकासात ग्रामीण भागाकडे दुर्लक्ष का ?

- मास्टर प्लॅन पुढे सरकत असताना जिल्हा नियोजन समिती निष्क्रिय
- गेल्या वर्षीचे ३,४०० हून अधिक प्रस्ताव पडूनच
- जिल्हा नियोजन मंडळाच्या बैठका नाहीत, आराखडा नाही, सूचना नाहीत
- स्थानिक स्वराज्य संस्था आणि नागरी गटांचा संताप

तिचे दुर्लक्षित होणे म्हणजे स्थानिक विकास गरजांकडे पाठ फिरवणे.

रॉड्रिग्ज यांनी राज्य सरकारच्या दृष्टिकोनावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत म्हटले, जर मडगावसाठी मास्टर प्लॅन करून केंद्र सरकारकडून निधी मिळवणे सरकारचे उद्दिष्ट असेल, तर तेच प्रयत्न संपूर्ण दक्षिण गोव्यासाठी डीपीसी मार्गे का नाही?

युनायटेड गोअन्स फाउंडेशन या स्थानिक नागरी गटाने डीपीसी संदर्भात

'गोवा टॅक्सी ड्रायव्हर ॲप'वर टॅक्सी संघटनांचा संताप

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. २८ : 'गोवा टॅक्सी, आमची टॅक्सी' या टॅगलाइनखाली गोवा सरकारने गुरुवारी नव्याने सुरू केलेल्या 'गोवा टॅक्सी ड्रायव्हर ॲप'ला तातडीने विरोधाचा सामना करावा लागत आहे. ॲपच्या सुधारित आवृत्तीला टॅक्सी चालकांना आकर्षित करण्यासाठी मोफत इंधनासारखी प्रलोभने देण्यात आली असली, तरी पर्यटक टॅक्सी संघटनांनी सरकारवर एकतर्फी निर्णय घेण्याचा आरोप करत, ॲप संपूर्णपणे फेटाळला आहे.

उत्तर गोवा टुरिस्ट टॅक्सी ओनर्स असोसिएशनचे अध्यक्ष वासुदेव आर्लेक यांनी सरकारवर संतप्त प्रतिक्रिया देत म्हटले आहे की , ते आम्हाला नाटकात का ओढत आहेत? आमच्या गाड्या घेऊन सरकारनेच त्या चालवाव्यात. त्यांना वाटते की आम्ही उद्योगपती आहोत ? हे सगळं वास्तवापासून दूर आहे.

सुधारित ॲपमध्ये, सलग ३० दिवस सकाळी ८ ते रात्री ८ या वेळेत सक्रिय राहून किमान ५० राईड्स पूर्ण करणाऱ्या पहिल्या ५०० चालकांना २५ लिटर मोफत इंधनाचे प्रोत्साहन जाहीर करण्यात आले आहे. इंधनाचा पर्याय पेट्रोल, डिझेल किंवा सीएनजी असा ठेवण्यात आला आहे. मात्र, संघटनांच्या मते, ही योजना स्थानिक टॅक्सी चालकांच्या मूळ अडचणींना डावलून केवळ देखावा करण्यापुरती मर्यादित आहे.

ही हालचाल गोवा ट्रान्सपोर्ट ॲग्रीगेटर मार्गदर्शक तत्त्वे, २०२५'च्या सार्वजनिक अभिप्रायाच्या ३० जूनच्या अंतिम मुदतीपूर्वीच करण्यात आली आहे. त्यामुळे पारंपरिक टॅक्सी चालकांमध्ये भीती निर्माण झाली आहे की, या ॲपच्या माध्यमातून ओला, उबरसारख्या राष्ट्रीय ॲग्रीगेटर्ससाठी दरवाजे उघडले जातील. मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी मोठ्या कंपन्यांना प्रवेश दिला जाणार नाही, असे जरी जाहीर केले असले, तरी चालकांच्या शंका अद्याप कायम आहेत.

परिवहन मंत्री मावीन गूदिन्हो यांनी ॲपच्या समर्थनार्थ म्हटले की, ही डिजिटल प्रणाली आधुनिकतेचा भाग आहे आणि सेवांचा दर्जा सुधारण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल आहे. मात्र, डिजिटल मीटरच्या सक्तीबाबत त्यांनाही विरोधाचा सामना करावा लागत आहे.

आर्लेकर यांनी सरकारवर आरोप करत सांगितले की, मुंबई, दिल्लीसारख्या मोठ्या शहरांतही टॅक्सी चालक डिजिटल मीटर न वापरत असल्याची अनेक उदाहरणे आहेत. मग फक्त गोव्यात का सक्ती केली जाते? हा सगळा उद्योग केवळ काही अधिक पैसे कमावण्याचा प्रयत्न आहे. त्यांनी दावा केला की, जे मीटर बाजारात सुमारे ४ हजार ला मिळतात, तेच मीटर सरकारच्या मान्यताप्राप्त डीलर्सकडून ११ हजार ला विकले जात आहेत.

ॲप-आधारित सेवांसाठी मार्गदर्शक तत्त्वे तातडीने लागू करा

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. २८ : गोव्याच्या 'ट्रान्सपोर्ट ॲग्रीगेटर मार्गदर्शक तत्त्वे २०२५' या प्रस्तावित धोरणाच्या अंतिम सार्वजनिक अभिप्रायाची मुदत १९ जून रोजी संपली असून, ट्रॅव्हल ॲण्ड टुरिझम असोसिएशन ऑफ गोवा (टीटीएजी) ने आता या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी स्पष्ट पाठिंबा दर्शवला आहे. या नव्या फ्रेमवर्कमुळे स्थानिक टॅक्सी चालकांचे संरक्षण होईल, असा टीटीएजी चा ठाम विश्वास आहे.

टीटीएजी चे अध्यक्ष जॅक सुखीजा यांनी हेराल्ड मिडियाशी बोलताना सांगितले की, या मार्गदर्शक तत्त्वांमुळे टॅक्सी चालकांना प्रति किलोमीटर स्थिर दर आणि किमान निश्चित उत्पन्न मिळण्याची हमी मिळेल. हे एक पारदर्शक आणि न्याय्य मॉडेल असून, भविष्यात गोव्यात शिरकाव करणाऱ्या मोठ्या राइड-हेलिंग कंपन्यांच्या शोषणापासून स्थानिक चालकांचे रक्षण करण्यासाठी ते अत्यावश्यक आहे.

सुखीजा यांनी नमूद केले की, अनेक बहुराष्ट्रीय ॲग्रीगेटर सुरुवातीला आकर्षक योजना देतात, परंतु नंतर नफ्यासाठी दर कमी करतात. हे मार्गदर्शक तत्त्व त्यांच्याविरोधात नाहीत, तर त्यांच्याकडून स्थानिकांचे शोषण होऊ नये यासाठी आहेत, असे ते म्हणाले.

टीटीएजी चे उत्तर गोवा उपाध्यक्ष आकाश माडगावकर यांनीही याच

▶ टीटीएजीचा सरकारला आग्रह

मताला दुजोरा देत सांगितले की, मोठ्या कंपन्या लवकरच कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून गोव्यात प्रवेश करतीलच. म्हणूनच आधीच नियम तयार करून सरकारने चोख पावले उचलणे आवश्यक आहे.

टीटीएजीचा असा युक्तिवाद आहे की, 'गोवा माइल्स' ही राज्य सरकार चालवत असलेली सेवा हे सिद्ध करते की ॲप-आधारित मॉडेल राज्यात कार्यक्षमतेने चालू शकते. मात्र, सध्या केवळ २६% टॅक्सीच या प्लॅटफॉर्मवर आहेत, त्यामुळे ग्राहकांसाठी उपलब्धता ही मोठी अडचण आहे.

स्थानिक टॅक्सी युनियनचा ॲपविरोध म्हणजे मागास वृत्तीचे उदाहरण असल्याचे टीटीएजी चे म्हणणे आहे. सतत ॲप्सना विरोध केल्याने ना पर्यटकांना सुविधा मिळते ना चालकांना सुसंगत उत्पन्न. तक्रारी येतात त्या जास्तीचे भाडे आकारणे, गैरवर्तन किंवा उशिरा सेवा देण्याच्या, असे सुखीजा यांनी स्पष्ट केले. तसेच त्यांनी निदर्शनास आणले की, सरकारकडून स्थानिक चालकांना स्वतःचे ॲप्स सुरू करण्याचे आवाहन वारंवार करण्यात आले होते, पण फारसे पुढाकार घेतले गेले नाही. स्मार्टफोन सर्वांकडे आहे. ॲप्स ग्रोसरी , फूड , ट्रॅव्हल मध्ये आहेत. मग टॅक्सी सेवेत का नाही? असा मुद्दा उपस्थित करत सुखीजा यांनी तंत्रज्ञान स्वीकारण्याची गरज अधोरेखित केली.

टीटीएजी ने टॅक्सी समुदायातील अंतर्गत संघर्षांवरही भाष्य केले. काही ड्रायव्हर्सना गोवा माइल्स'चा वापर केल्यामुळे अन्य चालकांकडून त्रास दिला जात असल्याच्या तक्रारी आहेत. काही हॉटेल्समध्ये तर ॲप-आधारित टॅक्सी ड्रायव्हर्सना प्रवेश नाकारला जातो, ज्यामुळे प्रवाशांना मुख्य प्रवेशद्वारापर्यंत चालत यावे लागते.

टॅक्सी समुदायात जुने-नवे अशा दोन पिढ्यांमध्ये मतभेद आहेत. तरुण चालक डिजिटल सेवांसाठी खुले आहेत, पण त्यांच्यावर युनियनमध्ये राहायचे असल्यास ॲपपासून दूर राहण्याचा दबाव असतो, असे टीटीएजी चे निरीक्षण आहे. सुखीजा यांनी स्पष्ट संदेश दिला की, या मार्गदर्शक तत्त्वांचा उद्देश कोणाचाही धोका निर्माण करणे नाही, तर संरक्षण देणे आहे.चालकांनी विरोधाच्या पलीकडे जाऊन यामध्ये सहभागी होऊन रचनात्मक सूचना द्याव्यात. ही संधी त्यांच्या भविष्यासाठी आहे.

टीटीएजी ने सरकारला विनंती केली आहे की, प्रस्तावित मार्गदर्शक तत्त्वे तातडीने लागू करण्यात यावीत, कारण ते निष्पक्ष आणि गरजेनुसार बदलांसाठी खुले असल्याचे त्यांनी नमूद केले. असे धोरण स्वीकारल्यास गोव्यातील टॅक्सी सेवा अधिक पारदर्शक, विश्वासार्ह आणि आधुनिक होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे.

३ कोटीचा बंधारा ठरला कुचकामी : ३०० हून अधिक कुटुंबांचे जीवन धोक्यात

खाजन शेतीचे नुकसान | तातडीने उंची वाढवण्याची शेतकऱ्यांची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड

फोंडा, दि. २८ : कुंडईमधील चिखलपाइण येथील खाजन शेतात गेल्या काही दिवसांत भरतीच्या वेळी कुंभारजुआ कालव्यातून पाणी ओव्हरफ्लो झाल्यामुळे स्थानिक शेतकऱ्यांमध्ये गंभीर चिंता निर्माण झाली आहे. हे पाणी नुकत्याच नूतनीकरण केलेल्या बंधाऱ्यातून आत शिरत आहे, जे या शेतांचे संरक्षण करण्यासाठी बांधण्यात आले होते.

शेतकऱ्यांना भीती आहे की या वारंवार येणाऱ्या पुरामुळे खाजन जमिनींचे नुकसान होईल आणि शेतीसाठी शेतांवर अवलंबून असलेल्या ३०० हून अधिक कुटुंबांचे जीवन धोक्यात येईल.

बाधित शेतकऱ्यांनी आता सरकारला बंधाऱ्याच्या संरक्षक भिंतीची उंची अर्धा मीटरने वाढवून आणि कंत्राटदाराला १५० मीटरच्या भागात जिथे पाणी शिरत आहे त्या भागातील गळती बंद करण्याचे निर्देश देऊन त्वरित कारवाई करण्याची विनंती केली आहे.

चिखलपाइण खाजन भाडेकरू संघटनेचे (सीकेटीए) अध्यक्ष विजेश नाईक म्हणाले की संपूर्ण एक किलोमीटरच्या बंधाऱ्यावर संरक्षक भिंतीची उंची वाढवणे हाच ओव्हरफ्लो होणाऱ्या खाऱ्या पाण्याचा प्रवेश रोखण्याचा एकमेव उपाय आहे. त्यांनी पुढे सांगितले की त्यांनी हा मुद्दा आधीच मृद संवर्धन विभागाच्या निदर्शनास आणून दिला आहे.

नाईक यांनी नुकत्याच नूतनीकरण केलेल्या बंधाऱ्याच्या बिघडत्या स्थितीबद्दल चिंता व्यक्त केली, ज्याची दुरुस्ती ३ कोटी रुपये खर्चून करण्यात आली. भरतीच्या वेळी, गेल्या काही दिवसांत पाण्याची पातळी लक्षणीयरीत्या वाढली आहे आणि ती नवीन बांधलेल्या संरचनेला जवळजवळ भेगा घालत आहे. जर हे असेच चालू राहिले तर बंधाऱ्याचा कालावधी जास्त काळ टिकेल याची खात्री नाही, असा इशारा त्यांनी दिला.

ते पुढे म्हणाले, सरकारने बंधाऱ्यावर आणि त्याच्या संरक्षक भिंतीवर ३ कोटी रुपये खर्च केले आहेत, परंतु खारे पाणी आमच्या शेतात कसे शिरत आहे याची पाहणी करण्यासाठी कोणताही अधिकारी भेट देत नाही. बंधाऱ्यावरील चिखल आधीच वाहून जाऊ लागला आहे.

नाईक यांनी आठवण करून दिली की यापूर्वी, बंधाऱ्यातील भेगांमुळे वारंवार पूर आला होता, ज्यामुळे सहा वर्षांहून अधिक काळ शेतात शेती करता येत नव्हती. अलिकडच्या नूतनीकरणामुळे, शेतकऱ्यांना यावर्षी पुन्हा लागवड सुरू करण्याची आशा होती. तथापि, समुद्राची पातळी वाढत असल्याने आणि भरतीच्या वेळी नदीच्या पाण्याचा प्रवाह वाढल्याने त्यांच्या योजना आता धुळीस मिळाल्या आहेत, ज्यामुळे पुन्हा एकदा शेतात खारे पाणी येत आहे. त्यांच्या अडचणीत भर म्हणजे प्लास्टिक कचरा - विशेषतः बाटल्या आणि तुटलेल्या काचा शेतात वाहून जात आहेत. आपण प्लास्टिकच्या बाटल्या काढून टाकू शकतो, पण तुटलेल्या काचा एक मोठा धोका निर्माण करतात. जर ओव्हरफ्लो असेच चालू राहिले तर शेती अशक्य होऊ शकते, नाईक म्हणाले.

त्यांनी भर दिला की सरकारने पुढील नुकसान टाळण्यासाठी जलदगतीने पावले उचलली पाहिजेत. भविष्यात नदीच्या पाण्याचा प्रवेश रोखण्यासाठी संरक्षक भिंत अर्धा मीटर उंच करणे अत्यंत महत्त्वाचे आहे, असे त्यांनी पुन्हा सांगितले.

नाईक यांनी असेही सांगितले की त्यांनी कुंभारजुआ कालव्यात बार्जची हालचाल थांबवण्याची विनंती केली आहे, कारण बार्जमुळे निर्माण होणाऱ्या लाटा मातीची धूप वाढवत आहेत आणि आधीच अनेक खारफुटीची झाडे उपटून टाकली आहेत.

कंत्राटदारावर निकृष्ट दर्जाच्या कामाचा आरोप करत त्यांनी आरोप केला की गळती ही निकृष्ट बांधकामाचा परिणाम आहे. १५० मीटरच्या पट्ट्यात अनेक गळतीचे ठिकाण आहेत, ज्यामुळे नदीचे पाणी आत शिरते. यामुळे बंधाऱ्याच्या अस्तित्वाला गंभीर धोका निर्माण झाला आहे, ज्यावर आमची शेती आणि उपजीविका अवलंबून आहे.

त्यांनी पुष्टी केली की नदी ओसंडून वाहत असल्याचे व्हिडिओ आणि अहवाल मृदसंधारण अधिकाऱ्यांना सादर करण्यात आले आहेत आणि शेतकरी समुदाय आता त्वरित सरकारी हस्तक्षेपाची वाट पाहत आहे.

बेकायदेशीर क्रशर हटवण्याचे पंचायतीकडून आदेश

■ गौरेश सत्तरकर
टीम दैनिक हेराल्ड

सावर्डे, दि. २८ : गुड्डेमळ मधील वादग्रस्त बेकायदेशीर क्रशर प्लांट अखेर हटवण्याच्या प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. जनतेच्या तीव्र संतापानंतर आणि हेराल्ड मिडियाने सातत्याने केलेल्या पाठ्यपुराव्यानंतर अखेर सावर्डे ग्रामपंचायतीला हा महत्त्वपूर्ण निर्णय घ्यावा लागला आहे .

सर्व्हे नंबर ८/१ मध्ये उभारलेला क्रशर प्लांट राज्य महामार्गाच्या अवघ्या १५ मीटर अंतरावर आणि नैसर्गिक नाल्यावर बेकायदेशीरपणे उभारण्यात आला होता. या बांधकामामुळे पर्यावरणीय धोक्यांबरोबरच नियामक नियमांचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आले होते.

ग्रामपंचायतीच्या बैठकीनंतर सरपंच चिन्मयी नाईक यांनी निर्णयाची पुष्टी करत सांगितले की , क्रशर मालकाने प्लांट हटवण्यास व साफसफाईस मान्यता दिली आहे. मात्र, आम्ही पाहणीस गेलो तेव्हा, मुसळधार पावसामुळे संपूर्ण यंत्रणा आधीच पाण्याखाली गेलेली होती. त्यांनी यंत्रसामग्री त्वरित हटवण्याच्या सूचना दिल्या असून, मालकाने देखील यावर लेखी आश्वासन दिल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

फक्त तात्पुरती परवानगी मिळाल्यानंतरही, संबंधित व्यक्तींनी संपूर्ण क्षमतेने उत्पादन सुरू केले होते. यामध्ये अनधिकृत जमीन भराव व झाडांची कत्तल यासारख्या गंभीर उल्लंघनांचा समावेश होता. **स्थानीय पर्यावरण कार्यकर्ते स्वप्नील भंडारी यांच्या सहकार्याने हेराल्ड मिडियाने या प्रकरणाची माहिती सार्वजनिक केली. त्यानंतर स्थानिक नागरिकांकडून तीव्र प्रतिक्रिया उमटल्या.

या वादानंतर पंचायत, नगर व देश नियोजन विभाग आणि इतर अधिकाऱ्यांनी संयुक्त पाहणी केली, त्यातूनच क्रशरवर स्थगन आदेश जारी करण्यात आला. मात्र, हे आदेश डावलून क्रशर मालकाने पुन्हा बांधकाम सुरु केल्याचे निदर्शनास आले आहे. **पावसाळ्यात परिसर जलमय होईपर्यंत काम सुरु होते, ज्यामुळे नागरिकांमध्ये अस्वस्थता वाढली.

यानंतरही पंचायतीने दस्तऐवज सादर करण्यासाठी तात्पुरते नूतनीकरण मंजूर केले. पण या कालावधीत क्रशर ऑपरेटरने महामार्गालगत अनधिकृत खंदक खोदले आणि विनापरवानगी झाडांची कत्तल केली, असा आरोप आहे. स्थानिक ग्रामस्थांनी वेळीच पोलीस आणि वन विभागाशी संपर्क साधून काम थांबवले.

यावर प्रतिक्रिया देताना सरपंच नाईक म्हणाल्या, दुसरे नूतनीकरण केवळ कागदपत्र सादर करण्याच्या प्रक्रियेसाठी दिले होते. पाण्यामुळे हे प्रयत्न अयशस्वी झाले. खंदक खोदकाम आणि झाडतोडीबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग आणि वन विभाग चौकशी करणार आहेत. त्यांनी हे देखील सांगितले की, परिसरातील इतर क्रशर धारकांनाही नोटिसा बजावण्यात आल्या असून, त्यांना तातडीने सर्व कायदेशीर कागदपत्रे सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

या प्रकरणातील प्रमुख तक्रारदार स्वप्नील भंडारी यांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करत म्हटले, पंचायतीने स्थगन दिले तरीही नूतनीकरण देण्यात आले. हे एकप्रकारे मालकाला संरक्षण देण्यासारखेच आहे. क्रशरचे बांधकाम अजूनही तिथेच आहे. जर ते वेळेत हटवले गेले नाही, तर आम्ही आंदोलन आणि कायदेशीर मार्गांनी पुन्हा लढा सुरू करू.

हा संपूर्ण प्रकार फक्त पर्यावरणीय शिस्तभंग नव्हे, तर स्थानिक प्रशासनाच्या जबाबदारीकडे बोट दाखवणारा एक गंभीर इशारा आहे.नागरिकांच्या एकजुटीमुळे आणि प्रसारमाध्यमांनी सातत्याने विषय उजेडात आणल्यामुळेच हा निर्णय शक्य झाला आहे. पुढील टप्प्यात शासनाने व कायद्यानं अधिक कठोर भूमिका घेण्याची गरज आहे.

MBBS

Ministry Of Health Of Russia
SMOLENSK STATE MEDICAL UNIVERSITY, RUSSIA
Invites Indian students for direct Government Admissions
Recognized by India, WHO, USA & UK, Min. Qual. 50% in XII in PCB
Satisfies all requirements of NMC of India

UNIVERSITY – 105 years old Medical University. The University is situated in the center of the Smolensk city. Smolensk is situated 380 km west of Moscow. Very high standards of education, strict disciplinary system. **2170** Indian students (**960** Girls) studying, **244** got degree in **2025.** Duration 6 years including internship and License. English Medium in all years, Closed type campus system, **8** attached hospitals (**9000** Beds).
MCI SCREENING TEST – Our graduates of **2008** to **2024** have given **BEST** results among graduates of all foreign medical colleges (Official web sites of Indian Embassy, Moscow and NBC conducting Screening Test confirm this). Dr. Aadi Morakhia, our graduate of 2023, has topped Screening Test 2023.
SPECIAL HOSTELS ONLY FOR INDIAN STUDENTS (BEST HOSTELS IN RUSSIA) 2 and 4 seated big rooms, separate hostels for boys and girls. **INDIAN MESS** - Mess with **Indian food** cooked by **Indian cooks**.
Fee (Tuition+Hostel+Med.Ins.) – **USD 6000** (Approx. Rs. 5,10,000/-) per year and one time payment of Rs.1,50,000/- (By Bank Draft only) which includes – Admission procedure, invitation letter, student visa, air ticket Delhi - Moscow.
Scholarship to all Indian students.
Bank loans are available from Indian banks.
Contact: **DR. ALOK AERON +7 9605805555 (Russia)**
Official web site: www.sgmu.info
Instagram: @sgmu.info
Admission details: admission.sgmu.live
INFORMATION CENTERS: (These are parents of our students)
Margao: Mr. Desai – 9850466525, **Ponda:** Mr. Chodankar – 8010274925
Mapusa: Mr. Kauthankar – 9823674160
Curchorem: Mrs. Naik – 9130630410, **Cuncolim:** Mr. Dessai – 9850785115